# District Sveep Plan

**“Accessible Elections”**

**“No Voter to be left behind”**

**ध्येय आणि उद्दीष्टे -**

1. जवळपास सर्वच मतदारांना ईपीक कार्ड उपलब्ध करून देणे
2. वयाची 18 वर्षे पूर्ण होणा-या नव मतदारांची 100 टक्के नोंदणी करून त्यांचा सहभाग वाढविण्याकरीता विशेष प्रयत्न करणे.
3. महिलांचा सहभाग वाढवून स्त्री -पूरूष यांचेतील तफावत दूर करणे
4. दिव्यांग व्यक्तींची 100 टक्के नोंदणी व सहभाग याकरीता मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना दिव्यांग व्यक्ती शोधण्याकरीता व त्यांचे नोंदणी करण्याकरीता निर्देश देण्यात आले आहेत.
5. दुर्गम भागात निवडणूक प्रक्रियेबाबत साक्षरता निर्माण करण्याकरीता लक्ष केंद्रीत करणे व नोडल ऑफीसर नेमून त्याचे माध्यमातून कॅम्पेनींग करणे. याकरीता स्थानीक प्रिंट मिडिया, सामाजिक संस्था,संघटना, राजकीय पक्षांची मदत घेणे.

**थोडक्यात माहिती -**

| तपशिल | आजरोजी असलेली संख्या | उद्दीष्ट |
|---|---|---|
| महसूल विभाग | अमरावती | - |
| जिल्हा | अकोला | - |
| लोकसभा मतदारसंघ | 1 | - |
| विधानसभा मतदारसंघ | 05 | - |
| एकूण जिल्हयाची लोकसंख्या | 1,813,906 | - |
| मतदारांची संख्या | 1466752 | - |
| पूरूष मतदार | 763444 | - |
| महिला मतदार | 703308 | - |
| दिव्यांग मतदार | 5913 | 8000 |
| सैन्य दलातील मतदार | 3539 | 5000 |
| मतदान केंद्राची संख्या | 1585 व नविन प्रस्तावित 96 | +96 |
| मतदान केंद्रस्तरीय अधिकारी | 1585 | +96 |
| Prospective Voter | 4949 | 6000 |

**मतदारांचे मदतीकरीता योजना -**

1. प्रिंट मिडिया व इलेक्ट्रानिक मिडिया यांचे माध्यमातून निवडणूक विषयक माहिती प्रसारित करणे.
2. मतदार स्लिप वितरीत करणे
3. मतदार मदत केंद्र कार्यान्वीत करणे.
4. हेल्प डेस्क स्थापन करणे.

**जिल्हा कोअर समिती व जिल्हास्तरीय दिव्यांग समिती**

- यांचे मार्फत शासकीय अशासकीय कार्यालये, संस्था,संघटना यांचेमार्फत मतदार नोंदणी वाढविणे, निवडणूक विषय जागृती निर्माण करणे,

**जिल्हयातील शासकीय/अशासकीय कार्यालये/बॅक व इतर काही संस्था यांचा सहभाग -**

1. **शैक्षणिक संस्था -** जिल्हयातील शिक्षणाधिकारी यांचे माध्यमातून शिक्षण क्षेत्रातील अग्रेसर शिक्षण संस्था,महाविदयालये, मेडिकल कॉलेज, इंजिनिअरींग कॉलेज, व इतर काही संस्था यांचे माध्यमातून जिल्हयात नविन तरूण मतदार यांचा सहभाग वाढविण्याकरीता प्रयत्न करण्यात येतील.
2. **औदयोगिक संस्था -** जिल्हयात मोठया प्रमाणावर महाराष्ट्र औदयोगिक विकास कंपनी आहेत. व त्याचे जिल्हाभर जाळे आहे. सदर कंपन्यांमध्ये काम करणारा अधिकारी वर्ग, कामगार वर्ग, कर्मचारी त्यांचे हेल्पर यांचा निवडणूकीतील सहभाग वाढविण्याकरीता औदयोगिक क्षेत्राचे ठिकाणी औदयोगिक क्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी यांचे माध्यमातून मतदार जागृती करीता विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात येतील.
3. **बँक -** जिल्हयात जवळपास सर्वच बँकाचे मुख्यालय व शाखा आहेत त्यांचे कडे जवळपास सर्वच नागरीक /मतदार हे व्यवहार करण्याकरीता नियमित ये-जा करत असतात. मतदारांमध्ये जागृती करण्याचे हे प्रभावी माध्यम ठरू शकते या दृष्टीकोनातून त्यांना प्रशिक्षीत करून त्यांचे माध्यमातून जिल्हाभर कार्यक्रम राबवून प्रसार करणे.
4. **पोस्ट ऑफीस -** आज सर्वत्र पोस्ट ऑफीस चा वापर करण्याचे प्रमाण वाढले असून त्यांचे द्वारा आम्ही जिल्हयामध्ये प्रसार व प्रसिध्दी करीता वापर करण्यात येणार आहे.
5. **प्रशिक्षण -** निवडणूक प्रक्रियेमध्ये आमुलाग्र बदल झाला असून त्याद्दष्टीकोनातून जिल्हयातील निवडणूकीतील सहभागी अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता प्रशिक्षण आयोजित करणे व त्यामाध्यमातून प्रशिक्षित अधिकारी व कर्मचारी यांचे माध्यमातून

स्विप कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याकरीता नियूक्त शासकीय,अशासकीय,संस्था, संघटना,महाविदयालयातील कर्मचारी व विदयार्थि यांना प्रशिक्षण देणे

**नियोजन-**

1. **जिल्हा स्विप नोडल अधिकारी -**जिल्हा स्विप नोडल अधिकारी म्हणून श्री प्रकाश अंधारे, जिल्हा समन्वयक शैक्षणिक गूणवत्ता कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय अकोला यांची नेमणूक करण्यात आली आहे. मतदारसंघातील स्विप नोडल अधिकारी नेमण्यात येतील.
2. **समन्वय अधिकारी** -प्रत्येक मतदार नोंदणी अधिकारी हे समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात येईल.
3. **Booth Awareness Group -** प्रत्येक मतदारसंघातील मतदान केंद्रावर स्थापन करण्यात आले असून त्यांचे प्रशिक्षण वर्गाचा कार्यक्रम सूध्दा आखण्यात आला आहे.
4. निवडणूक प्रक्रिया अधिकाधिक लोकाभिमुख करण्याचे दृष्टीकोनातून जिल्हयातील सामाजिक संघटना,प्रिंटमिडीया,औदयोगिक क्षेत्र, बँक,सर्व शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था,यांना सहभागी करून घेण्यात येत आहे व त्यांना याबाबत प्रशिक्षण देवून प्रोत्साहित करण्यात येत आहे.
5. **नविन तंत्रज्ञानाचा वापर करून जनजागृती करणे -** अकोला जिल्हयातील 5 विधानसभा मतदारसंघामध्ये खालीलप्रकारे नवनविन तंत्रज्ञानाचा वापर करून मतदार जागृती करण्यात येत आहे.

   1. मोबाईल ॲप

   2. NVSP द्वारे फॉर्म भरण्याबाबत जागृती करणे

   3. स्थानिक केबल नेटवर्क चा वापर करून प्रसिध्दी करणे

   4.जिल्हाधिकारी यांची ऑडीओ व व्हिडीओ क्लिप तयार करून महानगरपालिका व न.प.क्षेत्रात सूरू असलेल्या घंटा गाडीमध्ये बसवून प्रसार व प्रचार करणे.

   5. डिजीटल बॅनरद्वारे प्रसिध्दी करणे.

   6. फेसबूक,Twitter, रेडिओ, दिव्यांग मतदारांसाठी Whats App Group, इ. चे माध्यमातून जागृती करण्यात येईल.
6. **उददीष्टे -**

   **1. तरूण मतदार -** विविध शैक्षणिक संस्था,औदयोगिक संस्था, बँक, शासकीय व निम शासकीय कार्यालये, विविध संस्था,एम.आय.डी.सी एरिया, पि.के.व्हि मधील अधिकारी,कर्मचारी आणि संघटित व असंघटित कामगार

   2. प्रत्येक महाविदयालयाचे प्राचार्य हे कॅम्पस ॲबेसेडर असतील. तसेच शाळेतील गूणवंत विदयार्थी हा स्टूडंट ॲम्बेसेडर असतील.

3. एन.एस.एस. व एन.सी.सी चे सर्व प्रमुख व विदयार्थी यांचा सहभाग वाढविण्यात येईल.

4. नव्याने मतदार होणा-या नागरीकांना मतदार नोंदणी करीता प्रोत्साहित करण्याकरीता शाळा/महाविदयालयामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम व खेळाद्वारे जागृती निर्माण करणे.

5. प्रवेश प्रक्रियेवेळी व स्कॉलरशिप अर्ज भरतेवेळी मतदार नसलेल्या विदयार्थ्याकरीता मतदान नोंदणी अर्ज क्रं 6 भरणे बंधनकारक करण्यात येईल.

6.निवासी वसतीगृह/समाजकल्याण वसतीगृह/आदिवासी मुलांचे वसतीगृह याठिकाणी जावून सर्व पात्र विदयार्थ्यांची नाव नोंदणी करण्याकरीता प्रयत्न करण्यात येत आहेत.

7.तसेच भविष्यात 18 वर्ष पूर्ण करणा-या विदयार्थ्यांची नाव नोंदणी मतदार साक्षरता क्लब मार्फत करण्यात येत आहे.

7. **महिलांचा सहभाग वाढविणेकरीता करावयाच्या उपाययोजना -**

   1. शैक्षणिक संस्थाद्वारे नोंदणी करणे.

   2.आशा, अंगणवाडी सेविका व नेहरू यूवा केंद्राचे सहकार्याने महिलांची नोंदणी करण्यात येईल.

8. नविन विवाहित महिलांची माहिती विवाह नोंदणी कार्यालय मनपा,न.पा., ग्रामपंचायत कार्यालय यांचे कडून माहिती घेउन करण्यात येत आहे.

9. महिलांना निवडणूक प्रक्रियेमध्ये सामावून घेण्याकरीता व त्यांचा सहभाग वाढविण्याकरीता त्यांचेकरीता जिल्हयास्तरावर व मतदारसंघस्तरावर रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा,बचत गट मेळावे, सखी मंच लोकमत या सर्व माध्यमातून महिलांचा सहभाग वाढविण्याचे दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येतील.

10. **विविध कर्मचारी संघटना/वकील संघटना यांचा सहभाग -** जिल्हयात अकोला बार असोसिएशन यांचे माध्यमातून सर्व पात्र वकीलांची नोंदणी करणे, तसेच त्यांचेकडे येणारा प्रत्येक नागरीकांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला जाईल.

11. **विविध विभागांचा सहभागी करून महिला पर्यंत पोहचणे -** महिला व बाल कल्याण विभाग, सामान्य रूगणालय, अकोला, जिल्हा स्त्री रूग्णालय अकोला, स्त्री आधार गृहे, तसेच महिला विदयालये,महाविदयालये, स्पर्धा परीक्षा क्लासेस, NEET,JEE क्लासेस, शासकीय व खाजगी ग्रंथालये, तसेच जेल अधिक्षक,यांचे मार्फत महिलांची नोंदणी करण्यात येईल.

12. **दिव्यांग -**

1.जिल्हा स्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.तसेच मतदारसंघनिहाय दिव्यांग मतदारांची माहिती गोळा करण्यात येत आहे. बि.एल.ओ रजिष्टर ला दिव्यांग मतदार अशी नोंद करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

2.एक खिडकी सूविधा केंद्र सूध्दा प्रत्येक तालूकास्तरावर स्थापन करण्याबाबत सूचित केले आहे.

3. त्यांचेकरीता मोबाईलद्वारे,रेडीओ,स्थानिक नेटवर्क याद्वारे प्रचार व प्रसिध्दी करण्यात येईल.

4.दिव्यांगाकरीता असलेले सर्व संस्था,संघटना यांना सहभागी करून घेण्यात येत आहे.

5. तसेच मतदारसंघनिहाय विशेष शिबीरांचे आयोजन करण्यात येतील.

6.जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे वेबसाईट दिव्यांगाकरीता सहज वापरण्याजोगी करण्यात येईल.

13. **सैन्य दलातील मतदार -** Service Voter करीता Electronic Transmitted Postal Ballots वर असलेला आयोगाचा व्हिडीओ सूध्दा प्रसिध्दी करीता देण्यात येत आहे.

14. अनिवासी भारतीय मतदार - यांचे करीता 6A फॉर्म उपलब्ध करून देण्यात येत आहे. NVSP पोर्टला प्रसिध्दी देण्यात येत आहे.

15. **ग्रामीण व अनूसूचित क्षेत्र -**

**1.** या क्षेत्रामध्ये विशेष नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात येईल.

**2.** आठवडी बाजार,जत्रा, मेला विविध सणांचे माध्यमातून मतदार नोंदणी वाढविण्याकरीता प्रयत्न करण्यात येतील.

**3.** ग्रामसभा,प्रभात फेरी यांचे माध्यमातून प्रचार करण्यात येईल.

**4.** पथनाटय,लोककला,चे कार्यक्रम घेणे, भारूड,किर्तन,नाटक,नृत्य, एकांकिका इ.चे सादरीकरण त्यांचे सूध्दा व्हिडीओ काढून फेसबूक पेजला अपलोड करण्यात येतील.

16. **EVM VVPAT -**

1.सर्व राजकीय पक्ष,मिडिया,पत्रकार,शासकीय कार्यालय,कॉलेज व शाळा इ. यांना EVM VVPAT चे प्रत्यक्षात डेमो देण्यात येतील.

2.प्रत्येक बूथवर जावून याबाबत जागृती करण्यात येईल.

3. फीरते वाहनावर EVM VVPAT चे प्रत्यक्षात डेमो सूध्दा दाखविण्याकरीता सदर वाहन फीरवण्यात येईल. याबाबत प्रचार साहित्य उपलब्ध करून देण्यात येईल.
4.BAGs, BLOs, ELCs यासर्वांचे माध्यमातून EVM VVPAT बाबत साक्षरता मिशन राबविण्यात येईल.व संबंधित संस्थाना प्रशिक्षण सूध्दा देण्यात येईल.

5. मेळावे,बाजार,रेल्वे स्थानक, बसस्थानक व इतर लोकवस्तीचे ठिकाणी सूध्दा EVM VVPAT चे प्रत्यक्षात डेमो देण्याकरीता सर्व मतदारसंघांना सूचना देण्यात येतील.
6.प्रत्येक महिन्याला ग्रा.पं.ला EVM VVPAT बाबत जागृती करण्याकरीता सुचित केले जाईल.

17. **360 अंश प्रचार शिबीर** -

1. माहिती असलेले व नैतिक मतदान अंतर्गत
2. नोटा या पर्यायाबाबत जागृती करणे,सूदृढ लोकशाहीत राजकीय पक्षाचा नि:पक्ष सहभाग किंवा लोकशाही बळकटीकरणाबाबत राजकीय पक्षाची भूमिका इ. विषयावर वक्तृत्व स्पर्धा,वादविवाद स्पर्धा आयोजित करणे.

सबब अकोला जिल्हयातील 5 विधानसभा मतदारसंघामध्ये वरीलप्रमाणे जन जागृती पर कार्यक्रम/स्पर्धा/खेळ/शिबीरे आयोजित करून मतदार नोंदणी/ईव्हीएम-व्हिव्हिपॅट बाबत साक्षरता वाढविणे, निवडणूक प्रक्रियेमध्ये महिला,दिव्यांग यांचा सहभाग वाढविण्याचा जिल्हा प्रशासनाचा मानस आहे.

**आस्तीककूमार पाण्डेय, भा.प्र.से**
**जिल्हाधिकारी तथ जिल्हा निवडणूक**
**अधिकारी अकोला**